सामान्य प्रशासन

सूचना का अधिकार

राष्ट्रीय हिंदी साप्ताहिक
फोटोग्राफर टाइम्स
संपादक : किरण मांजरेकर
अध्यक्ष : अखिल भारतीय माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (नि)
महाराष्ट्र शासन जाहिरात मान्यता प्राप्त अखबार

PRESS

शॉप नं. 1, साई शक्ती नगर, वृंदावन मार्ग, ओवरीपाडा, दहिसर (पूर्व), मुंबई-68. मो.: 09987 52 1767 • E-mail : kiran.photographertimes@gmail.com

मिरा भाईंदर महानगरपालिका
प्रभाग समिती कार्यालय क्र. ३
आवक क्र. ...६९...
दाखल दि. ...
१५/३/२३
लिपीक

जावक क्र. फो.टा./आर.टी.आय./६३३१/२०२३ दिनांक- १०/०३/२०२३

**केंद्रिय माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ (१) अन्वये अर्ज.**

**प्रति, मा. शासकीय जनमाहिती अधिकारी तथा मा. महापालिका आयुक्त,**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, इंदिरा गांधी भवन,**
**छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम), ता.जि.ठाणे- ४०११०१.**

RIGHT TO INFORMATION ACT
PLEASE DO NOT DELAY

**महोदय,**

**केंद्रिय माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळवण्याचा अर्ज.**

१) **अर्जदाराचे संपूर्ण नाव** : **श्री. किरण मांजरेकर.**

२) **कार्यालयाचा पत्ता** : शॉप नं. ०१, साई शक्ती नगर, वृंदावन मार्ग, ओवरीपाडा, दहिसर (पूर्व), मुंबई- ४०००६८. मोबाईल नं.-९९८७५२१७६७.

३) **आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :**

**(एक) माहितीचा विषय** : माझा तक्रार अर्ज दिनांक- २३/०१/२०२३ (जावक क्र. फो.टा./पत्र/६२२३/२०२३) (पत्र प्राप्त दिनांक-०१/०३/२०२३) सोबत प्रत जोडली आहे. त्या अन्वये आपल्या विभाग व संबंधीत विभाग यांनी केलेली कार्यवाही व कारवाईची स्पष्ट लेखी माहिती मिळावी व ती माहिती असलेल्या सर्व प्रकारचे अभिलेख, नोंदी, पत्र व्यवहार, नोटिसा, चौकशी, तपास व अहवाल यांच्या प्रती मिळाव्यात.

**(दोन) माहितीशी संबंधीत कालावधी** : सुरूवाती पासून ते ज्या दिवशी माहिती द्याल त्या तारखे पर्यंत.

**(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :**
खालील मुद्देनिहाय माहिती लेखी तसेच छायांकित प्रती स्वरूपा मध्ये प्रत्येक पृष्ठावर **"सदर प्रत माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आली आहे"** असा शिक्का मारुन मा. जनमाहिती अधिकाऱ्याचे पुर्ण नाव, पदनामासह प्रत्येक पृष्ठावर स्वाक्षरी करून पोस्टाद्वारे मिळावी.

❖ माहितीच्या झेरॉक्स, प्रिंट प्रति साक्षांकित करून टपालाद्वारे मिळाव्यात कारण कोरोनाच्या जागतिक महामारीमुळे त्याचा प्रादुर्भाव आणखी वाढून शासनाच्या अडचणी वाढू नये म्हणून प्रत्यक्ष कार्यालयात हजर राहता येणे शक्य नाही.

P.T.O.

**ए)** माझा तक्रार अर्ज दिनांक- २३/०१/२०२३ (जावक क्र. फो.टा./ पत्र/६२२३/२०२३) (पत्र प्राप्त दिनांक- ०१/०३/२०२३) सोबत प्रत जोडली आहे. त्या अन्वये आपल्या विभाग व संबंधीत विभाग यांनी केलेली कार्यवाही व कारवाईची स्पष्ट लेखी माहिती मिळावी व ती माहिती असलेल्या सर्व प्रकारचे अभिलेख, नोंदी, पत्र व्यवहार, चौकशी, तपास व अहवाल यांच्या प्रती मिळाव्यात.

**सूचना : माहिती देण्यास ताळाटाळ केल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या विरुद्ध सोबत जोडलेल्या FIR प्रमाणे कारवाई होऊ शकते याची नोंद घ्यावी.**

**बी)** शासकीय परिपत्रक क्रमांक केमाअ / २००८/८७०/प्र.क्र.३००/०८/सहा. दिनांक- १३/०५/२००९ आणि / किंवा बृहन्मुंबई महानगर पालिका, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक एमओएम/१००१, दिनांक- ११/०५/२०११ अन्वये ईएमओ / मनिऑर्डर / भारतीय पोस्टल आर्डर/ चेक / डी. डी. द्वारे पाठविणार आहे. ती स्विकारणे आपणावर बंधनकारक आहे. ती कोणाच्या नावे पाठवावी लागेल ते कळवावे. मुद्देनिहाय पृष्ठ संख्या व मुद्देनिहाय शुल्क ही माहिती देणे आवश्यक आहे.

**सी)** **कलम १९ (१)** आणि **कलम १९ (२)** अन्वये नेमणुक केलेले मा. प्रथम अपिलीय अधिकारी व मा. द्वितीय अपिल अधिकारी यांचे पुर्ण नावे, पद व पूर्ण कार्यालयीन पत्ता मिळावा.

**डी)** जी माहिती आपल्या अभिलेखावर आहे ती माहिती देऊन इतर माहिती जी इतर कार्यालयाकडे आहे तेथे तेथे हा माझा अर्ज **कलम ६ (३) (i) (ii)** अन्वये आवश्यक कार्यवाही करून ५ (पाच) दिवसाच्या आत हस्तांतरित करावा व त्याविषयीच्या पत्र व्यवहाराच्या प्रति, जावक क्रमांक, त्यासंबंधीत कार्यालयाचा पुर्ण पत्ता व पिन कोड ही माहिती मिळावी.

१. माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीश: आवश्यक आहे किंवा कसे
(प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्का मध्ये समाविष्ट केला जाईल) : टपालाद्वारे / शिघ्र टपालाद्वारे

२. टपालाद्वारे असेल त्याबाबतीत (सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शिघ्र): टपालाद्वारे / शिघ्र टपालाद्वारे

३. अर्जदार दारिद्र रेषेखाली आहे काय : नाही.

ठिकाण : मुंबई.

**अर्जदार**

फोटोग्राफर टाइम्स

Manjrekar

संपादक

किरण मांजरेकर




**सुचना** — सदर गंभीर प्रकरणी मी स्वत: अर्जदार आहे म्हणून या प्रकरणाशी व्यापक लोकहिताच्या दृष्टीकोना मधून माझा थेट संबंध आहे व व्यापक लोकहिताच्या दृष्टिकोनातून सदर विषय असल्यामुळे मला अचुक माहिती वेळेत मिळावी. माहिती वैयक्तिक स्वरूपाची आहे, तपास चालू आहे, कार्यालयात येऊन पाहणी करावी अशी मोघम उत्तरे कृपया मला देऊ नयेत. शासकीय प्राधिकरण / कार्यालये यांच्या अभिलेखावर असलेली माहिती खाजगी स्वरूपाची नसते व ती देणे बंधनकारक आहे. कारण मागणी केलेली माहिती संसदेला किंवा राज्य विधान मंडळाला नाकारता येत नाही.

**P.T.O.**

**सोबत जोडलेला माझा लेखी युक्तीवाद पहावा व त्याप्रमाणे कार्यवाही करावी, ही नम्र विनंती.**

**माझा लेखी युक्तीवाद**

**माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६ (१) अन्वये केलेल्या अर्जा विषयी मी आपले लक्ष खालील मुद्दयांकडे वेधू इच्छितो.**

१) खालील प्रमाणे मी नम्रपणे आपल्या निदर्शनास आणुन देऊ इच्छितो की, **" जी माहिती संसदेला किंवा राज्य विधान मंडळाला देण्यास नकार देता येत नाही ती माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यासही नकार देता येणार नाही."**

२) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०१५/ प्र. क्र. (२३६/१५) सहा. मंत्रालय, दिनांक- १९/१२/२०१५ आणि / किंवा रामाआ २००६/प्र.क्र.(१७८/१६) सहा. दिनांक- ०१/०२/२०१७ आणि / किंवा बृहन्मुंबई महानगर पालिका, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक. एमओएम / १६४०, दिनांक- ०३/०८/२०११ ह्या परिपत्रका मध्ये नमुद केले आहे की, माहिती देताना **"सदर प्रत माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत देण्यात आली आहे."** असा शिक्का मारून **मा. जनमाहिती अधिका-याचे पुर्ण नाव, पदनामासह प्रत्येक पृष्ठावर स्वाक्षरी करून द्यावी.** त्यामुळे साक्षांकित करण्यासाठी फी आकारण्याची आवश्यकता राहणार नाही. त्यामुळे प्रति पृष्ठ रुपये २/- (दोन) व नकाशा (मोठी प्रत) रुपये ६०/- (साठ) देय होत आहेत. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ मधील नियम क्रमांक ४ (१) (ब) मध्ये दिलेल्या तरतूदी पहाव्यात.

३) माहिती स्पष्टपणे मागितली आहे ती नाकारण्याच्या हेतूने कार्यालया मध्ये येऊन पहावे व माहिती घेऊन जावे, वेबसाइट पहावे अशी दिशाभूल करणारी माहिती / पत्रे देऊ नयेत. माहिती जरी वेबसाइटवर असली तरी त्याच्या प्रिंट प्रति/ छायांकित प्रति वरिल परिपत्रकानुसार साक्षांकित करून देणे आवश्यक आहे.

४) महाराष्ट्र राज्य माहिती आयोग यांचे खालील परिपत्रक क्र. मुमाआ २०१९/प्र. क्र.५०/ १, दिनांक- २५/०६/२०१९ चे अवलोकन करावे. त्या अन्वये माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीस आयोगा समारे व्यक्तीशः प्रत्यक्ष हजर राहणे बंधनकारक केलेले आहे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारीत करून त्याची पूर्तता होत आहे हे पाहण्याची जबाबदारी त्यांच्यावर निश्चित केली आहे व त्यांच्याकडून निष्काळजीपणा / दुर्लक्ष झाल्यास ते कलम १९ (८) (क) अनुसार शिस्त भंगाच्या कारवाईस पात्र ठरतात व माहिती अधिकारी कलम २० (१) व (२) तसेच १९ (८) (क) अनुसार दंडात्मक व शिस्त भंगाच्या कारवाईस पात्र ठरतात.

५) शासन परिपत्रक क्रमांक. मपुवि – २०००/ प्र. क्र. ३०८ / सांका- २, मंत्रालय, दिनांक- ०४/०३/२००६ व इतर अधिनियम परिपत्रकां अन्वये माहिती गहाळ झाली असल्यास संबंधित कर्मचारी **५ (पाच) वर्षांचा कारावास व दंडाच्या शिक्षेस पात्र ठरतात.** Now it is settled Law that if the information requested is not traceable, Misplaced, Destroyed FIR is required to be registered against P.I.O. as per Decision / Order of Hon'ble High Court Bombay in Writ Petition No. 6961 of 2012, Judgement Pronounced on 27th February 2015.

**P.T.O.**

६) माहिती अधिकार अधिनियम २००५ चे अर्ज, अपिल यासाठी कार्यवाही करताना खालील मार्गदर्शन परिपत्रकाचे अवलोकन करून कार्यवाही करावी.

(ए) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. केंमाअ-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६ (मा.अ.), दिनांक- १२/१२/२००७.

(बी) मनपा परिपत्रक क्र. एमओएम / १११९, दिनांक- २५/०२/२०११.

(सी) मुख्य माहिती आयुक्त यांचे दिनांक- २४/०२/२००९ चे मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक- २४/०२/२००९ चे पत्र.

(डि) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.केमाअ-२००८/प्र.क्र.९३/०८/सहा.(मा.अ.), दिनांक- ०६/०९/२००८.

(इ) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. केंमाअ-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/६, दिनांक- ३१/०३/२००८.

(एफ) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०१३ / प्र.क्र.८/१८ (र व का), दिनांक- १८/०१/२०१३.

ठिकाण : मुंबई.

दिनांक : १०/०३/२०२३

भ्रष्टाचार मिटाओ -- नया भारत बनाओ
ERADICATE CORRUPTION-BUILD A NEW INDIA

RIGHT TO INFORMATION ACT
PLEASE DO NOT DELAY

अर्जदार

फोटोग्राफर टाइम्स

Manjrekar

संपादक

किरण मांजरेकर

# मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रभाग कार्यालय क्र.०३
कै.मोरेश्वर नारायण पाटील, खारी तलाव मराठी शाळा क्र.६, दुसरा माळा,
भाईंदर (पु.) ता.जि.ठाणे ४०१ १०५ दुरध्वनी क्रं.२८७८५२२

जा.क्र.मनपा/प्र.का.३/भा.पु./ — / ८४५ /२०२२-२३ दिनांक :-१७ / ३ /२०२३

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
म.प./न.प./ज.प.
आवक क्र........९०...........
दिनांक:- २४ / 3 /2023

प्रति,
मा. नगरसचिव सो.
नगरसचिव विभाग
भाईंदर (प.) ४०११०१.

**विषय : "केंद्रशासनाचा माहिती अधिकार अधिनियम २००५" अन्वये माहिती मिळणेबाबत.**
**संदर्भ : श्री. किरण मांजरेकर यांचे दि. १०/०३/२०२३ रोजीचे माहिती अधिकार अंतर्गत अर्ज. (प्राप्त दि. १५/०३/२०२३)**

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस कळविण्यांत येते कि, "केंद्रशासनाचा माहिती अधिकार अधिनियम २००५" अन्वये श्री. किरण मांजरेकर यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय येथे केलेल्या दि. २३/०१/२०२३ (जा. क्र. फोटा./पत्र/६२२३/२०२३) रोजीच्या अर्जावर संबंधित विभाग यांनी केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती अपेक्षिलेली आहे. त्या अनुषंगाने उक्त पत्राचे अवलोकन केले असता सदरचा विषय हा आपल्या विभागाशी संबंधित असल्याने सदरचा अर्ज पुढील कार्यवाही करिता आपल्या विभागात वर्ग करण्यात येत आहे.

तरी अर्जदार यांनी अपेक्षिलेली माहिती त्यांना मुदतीत परस्पर देण्यात यावी.

**सोबत :- संदर्भिय पत्राची मुळ प्रत.**

(प्रभाकर म्हात्रे)
सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र. ०३
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :
श्री. किरण मांजरेकर
शॉप नं. ०१, साई शक्ती नगर, वृंदावन मार्ग,
ओवरीपाडा, दहिसर (पु.) मुंबई – ४०००६८.
मोबाईल नं. ९९८७५२१७६७

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
सचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./90 /2023 दिनांक :-28/03/2023

प्रति,
श्री. किरण मांजरेकर,
संपादक, फोटोग्राफर टाइम्स,
शॉप नं. 1, साई शक्ती नगर,
वृंदावन मार्ग, ओवरीपाडा, दहिसर (पूर्व).

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.
तक्रार अर्ज दि. 23/1/2023 (जावक फो.टा./पत्र/6223/2023) (पत्र प्राप्त दि. 1/3/23) आपला विभाग व संबंधित विभाग यांनी केलेली कार्यवाही व कारवाईची स्पष्ट लेखी माहिती मिळावी व ती माहिती असलेल्या सर्व प्रकारचे अभिलेख, नोंदी, पत्रव्यवहार, नोटिसा, चौकशी, तपास व अहवाल यांच्या प्रती मिळाव्यात.

संदर्भ :- 1) सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र. 3 यांचेकडील जा.क्र.मनपा/प्र.का.3/भा.पु./845/2022-23 दि 17/03/2023 रोजीचे पत्र. (या कार्यालयास प्राप्त दि. 24/3/2023)
2) आपणांकडील दि. 15/03/2023 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

महोदय,

सहा. आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र. 3 संदर्भित पत्र क्र 01 अन्वये आपणांकडील संदर्भित पत्र क्र. 02 ची मुळप्रत या कार्यालयाकडे आपणांस परस्पर माहिती उपलब्ध करुन देणेसाठी वर्ग केलेली आहे.

आपण माहिती अधिकार नियमांतर्गत संदर्भित पत्र क्र. 02 अन्वये दि. 23/01/2023 (जावक फो.टा./पत्र/6223/2023) (पत्र प्राप्त दि. 01/03/2023) आपला विभाग व संबंधित विभाग यांनी केलेली कार्यवाही व कारवाईची स्पष्ट लेखी माहिती मिळावी व ती माहिती असलेल्या सर्व प्रकारचे अभिलेख, नोंदी, पत्रव्यवहार, नोटिसा, चौकशी, तपास व अहवाल यांच्या प्रतींची मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने नगरसचिव विभागातील अभिलेखी पडताळणी केली असता, आपणांकडील दि. 23/01/2023 रोजीचा तक्रार अर्ज सचिव कार्यालयास दि. 20/03/2023 रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे. प्राप्त तक्रारीनुसार या कार्यालयाकडील पत्र क्र. जा.क्र. मनपा/सचिव/ज.प./85/2022-23, दि. 21/03/2023 अन्वये श्री. रजनिकांत पांडुरंग मयेकर यांना महानगरपालिकेचे बोधचिन्ह न वापरणेबाबत व त्यांचे पदाचे नावासमोर माजी शब्द वापरणेबाबत लेखी कळविले असल्याचे दिसून येत आहे. सदर्भास्तव उक्त पत्राची साक्षांकित प्रत आपणांस उपलबध करुन देत आहोत.

तसेच या कार्यालयाकडील पत्र क्र. जा.क्र. मनपा/सचिव/ज.प./85/2022-23, दि. 23/03/2023 अन्वये सचिव विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत आपणांस लेखी अवगत केले असल्याचे दिसून येत आहे. संदर्भास्तव उक्त पत्राची साक्षांकित प्रत आपणांस उपलबध करुन देत आहोत.

उक्त माहितीकरिता लागणारे शुल्क प्रति पान रुपये 2/- याप्रमाणे एकूण 2 पानांकरिता रुपये 4/- (अक्षरी रुपये चार मात्र) महानगरपालिका फंडात भरणा करुन पावतीची छायांकित प्रत जमा करुन माहिती घेण्यात यावी.

सदरचे पत्र दि-29/3/2023 रोजी शिपाई यांच्याद्वारे पाठविले

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

<Dial 18002666868> <Wear Masks, Stay Safe>
EM176601881IN IVR:6977176601881
SP BHAYANDER WEST S.O <401101>
Counter No:1,29/03/2023,11:04
To:KIRAN,,
PIN:400068, Dahisar SO
From:SACHIV VIBHAG,,
Wt:20gms
Amt:17.70(Cash)Tax:2.70
<Track on www.indiapost.gov.in>

pc 2U:\01 Pranali\Mahiti Adhikar\Letter - Kiran

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401101
## सचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/ज.प./ ८५ /2022-23 दिनांक :- २१/ ०३/2023

प्रति,
श्री. रजनीकांत मयेकर,
फ्लॅट नं. जी-1, राहुल कुंज अपार्ट,
राहुल पार्क कॉलनी, राहुल पार्क रोड,
जेसल पार्क जवळ, भाईंदर (पू.)

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नावाचा व लोगोचा उल्लेख करुन मंत्रालयातील शासकीय कर्मचाऱ्याला लेटर हेडवरती धमकी वजा लेखी पत्र पाठवित असल्याबाबत कडक कायदेशीर कारवाई करण्याबाबत.

संदर्भ :- श्री. किरण मांजरेकर, संपादक, फोटोग्राफर टाइम्स यांचे दि. 23/01/2023 रोजीचे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये तक्रारदार श्री. किरण मांजरेकर, संपादक, राष्ट्रीय हिंदी साप्ताहिक फोटोग्राफर टाइम्स यांनी श्री. रजनीकांत मयेकर प्रभाग समिती क्र.3 हे आजही नगरसेवक आहेत, असे भासवून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नावाचा व लोगोचा उल्लेख करुन मंत्रालयातील शासकीय कर्मचाऱ्याला लेटर हेडवरती धमकी वजा लेखी पत्र पाठवित असल्याबाबत त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करणेची मागणी केलेली आहे. तसेच तक्रार अर्जासोबत आपण श्री. भिकाजी केशव पेडणेकर, कर्मचारी, नियोजन विभाग, मंत्रालय यांचे नावे अग्रेषित केलेले दि. 18/01/2023 रोजीच्या अर्जाची प्रत जोडलेली आहे.

तक्रारदार यांनी तक्रार अर्जासोबत जोडलेले आपले दि. 18/01/2023 रोजीच्या पत्राचे अवलोकन केले असता, आपल्या लेटरहेडवर महानगरपालिकेच्या बोधचिन्हाचा वापर झाल्याचे दिसून येत आहे. तसेच स्वीकृत सदस्य - प्रभाग समिती क्र. 3 असे नमुद करण्यात आल्याचे दिसून येत आहे.

महानगरपालिकेच्या सर्व पालिका सदस्यांची व विविध समिती सदस्यांची मुदत दि. 28 ऑगस्ट 2022 रोजी संपुष्टात आलेली आहे. करिता या कार्यालयाकडील पत्र क्र. जा.क्र.मनपा/सचिव/85/2022-23, दि. 15/9/2022 अन्वये मुदत संपलेल्या सर्व पालिका सदस्यांना व विवीध समिती सदस्यांना महानगरपालिकेच्या बोधचिन्हाचा वापर न करणेबाबत तसेच आपल्या पदाच्या नावासमोर माजी शब्द नमुद करणेबाबत कळविले आहे. तरी देखील आपण दि. 18/01/2023 रोजी अग्रेषीत केलेल्या पत्राच्या लेटर हेडवर महानगरपालिकेचे बोधचिन्हाचा वापर केल्याचे व माजी शब्दप्रयोग न करता स्विकृत सदस्य, प्रभाग समिती क्र. 03 नमूद केल्याचे दिसून येत आहे.

तरी यापूढे आपण महानगरपालिकेच्या बोधचिन्हाचा बेकायदेशीरपणे वापर करु नये. तसेच आपल्या पदाच्या नावासमोर माजी शब्द नमुद करावा. आपण या सुचनेचे पालन न केल्यास व महापालिकेच्या बोधचिन्हाचा बेकायदेशीरपणे वापर केल्यास व आपल्या पदाच्या नावासमोर माजी शब्द नमुद न केल्यास आपणाविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यांत येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार २००५ अंतर्गत देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

pc 2C:\01 Pranali\Letter\Letter - Rajnikant Mayekar.docx

Recieved
२१/३/२३

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401101

## सचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/ज.प./ 84 /2022-23 दिनांक :-२३/ 03 /2023

प्रति,
श्री. किरण मांजरेकर,
संपादक, राष्ट्रीय हिंदी साप्ताहिक फोटोग्राफर टाईम्स,
शॉप नं. 1, साई शक्ती नगर, वृंदावन मार्ग,
ओवरीपाडा, दहिसर (पूर्व), मुंबई - 68.

विषय :- श्री. रजनीकांत पांडुरंग मयेकर, माजी स्विकृत सदस्य, प्रभाग समिती क्र. 03 हे आजही नगरसेवक आहेत, असे भासवून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नावाचा व लोगोचा उल्लेख करुन मंत्रालयातील शासकीय कर्मचाऱ्याला लेटर हेडवरती धमकी वजा लेखी पत्र पाठवित असल्याबाबत त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी याबाबत.

संदर्भ :- 1) आपणांकडील दि. 23/01/2023 रोजीचे पत्र.
2) या कार्यालयाकडील पत्र क्र. जाक्र. मनपा/सचिव/ज.प./85/2022-23, दि. 21/03/2023.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण श्री. रजनीकांत पांडुरंग मयेकर, माजी स्विकृत सदस्य, प्रभाग समिती क्र.3 हे आजही नगरसेवक आहेत, असे भासवून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नावाचा व लोगोचा उल्लेख करुन मंत्रालयातील शासकीय कर्मचाऱ्याला लेटर हेडवरती धमकी वजा लेखी पत्र पाठवित असल्याबाबत त्यांच्यावर कडक कायदेशीर कारवाई करणेची मागणी केलेली आहे.

त्या अनुषंगाने, या कार्यालयाकडील संदर्भित पत्र 02 अन्वये श्री. रजनीकांत पांडुरंग मयेकर, माजी स्विकृत सदस्य, प्रभाग समिती क्र. 03 यांना महानगरपालिकेचे बोधचिन्ह न वापरणेबाबत तसेच आपल्या पदाच्या नावासमोर माजी शब्द वापरणेबाबत कळविले आहे. तसेच श्री. रजनीकांत पांडुरंग मयेकर कोणत्याही व्यक्तीस धमकी दिलेली असेल अथवा धमकी देत असतील तर त्या व्यक्तीने योग्य प्राधिकरणाकडे दाद मागणे उचित होईल.

माहिती अधिकार २००५ अंतर्गत
देण्यात आलेली माहिती सत्यप्रत
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :- संदर्भित पत्र 02 ची छायांकित प्रत.

pc 2U:\01 Pranali\Letter\Letter - Kiran Manjrekar.docx

दि. 23/3/2023 रोजी अर्जदारास सदर पत्र शिघ्रटपालाने पाठविले.